खरेदीखत घर जागेचे किंमत रु. २१,००,०००/- (एकेवीस लाख रु) घर जागा शहर उस्मानाबाद येथील नगर परिषदेच्या हद्दीमधील दि. ०७/११/२०१४ (विभाग क्र. १.२२)

लिहुन घेणार :- १) मुजमील अब्दुलकरीम खान, वय वर्षे ३५, धंदा व्यापार रा. भाग्य नगर, उस्मानाबाद. (PAN : CJHPK 5922 P)

२) मुदस्सर अब्दुलकरीम खान, वय वर्षे २८, धंदा व्यापार रा. भाग्य नगर, उस्मानाबाद. (PAN : BRTPK 3523 P)

लिहुन देणार :- अकबरखान गुलाबखान पठाण, वय वर्षे ४५, धंदा व्यापार रा. समता नगर, उस्मानाबाद. (PAN : ABSPP 8815 D)

कारणे खरेदीखत घर जागेचे लिहून देतो की, मला व्यापार धंद्यासाठी रकमेची गरज असल्यामुळे विक्री ठरावाप्रमाणे मी तुम्हापासुन खालीलप्रमाणे चेकद्वारे व रोख रक्कम घेतलेली आहे.

१) पुर्वीच वेळोवेळी रोख घेतले ते रु. १,००,०००/- (एक लाख रु.)

२) बॅंक ऑफ महाराष्ट्र आनंद नगर शाखा उस्मानाबाद चा चेक नंबर २८६९६१ दिनांक ३०/१०/२०१४ द्वारे घेतले ते रु. ५,००,०००/- (पाच लाख रु.)

३) बॅंक ऑफ महाराष्ट्र आनंद नगर शाखा उस्मानाबाद चा चेक नंबर २८६९६२ दिनांक ३०/१०/२०१४ द्वारे घेतले ते रु. ५,००,०००/- (पाच लाख रु.)

४) बॅंक ऑफ महाराष्ट्र मुख्य शाखा उस्मानाबाद चा चेक नंबर १८९४८१ दिनांक ०७/११/२०१४ द्वारे घेतले ते रु. ५,००,०००/- (पाच लाख रु.)

उमाब
४२ ५५ /१२२
२०१४

Scanned with OKEN Scanner

५) बँक ऑफ महाराष्ट्र मुख्य शाखा उस्मानाबाद चा चेक नंबर १८९४८२ दिनांक ०७/११/२०१४ द्वारे घेतले ते रु. ५,००,०००/- (पाच लाख रु.)

असा संपुर्ण ठरलेला भरणा मला रु. २१,००,०००/- (एकेवीस लाख रु) पोहचला. भरण्याची तक्रार राहीलेली नाही.

या संपुर्ण रकमेच्या मोबदल्यात माझी खरेदी कब्जे मालकी वहीवाटीची, निर्वेध व बिनबोजा अशी घर जागा नोंदणी तुकडी जिल्हा पोटतुकडी आणि तालुका उस्मानाबाद, यापैकी शहर उस्मानाबाद येथील नगर परिषदेच्या हद्दीमधील घर जागेचा तपशिल....

शिट क्रमांक ४३ यामधील सिटी सर्व्हे नंबर ४४४७ हा असुन यापैकी पुर्व बाजुची जागा याचा नगर परिषद घर नंबर २७/३०७ पुर्ण आहे. याची लांबी दक्षिणोत्तर ५० फुट याचे १५.२४ मीटर व रुंदी पुर्व पश्चिम ३० फुट याचे ९.१४ मीटर असुन या जागेचे एकुण क्षेत्रफळ १३९.२९ चौरस मीटर आहे.

सदर पुर्ण जागेत १ मजली (तळ मजला + पहिला मजला) इमारत बांधलेली असुन सदर जागेच्या तळ मजल्यावर पुर्ण जागेत म्हणजे १३९.२९ चौरस मीटर क्षेत्रात आर.सी.सी. मध्ये बांधलेले बांधकाम असुन पहिल्या मजल्यावर २० चौरस मीटर बांधकाम आहे. या पुर्ण बांधकामासह तसेच सदर जागेतील न. प. चे नळ कनेक्शन व महावितरण कंपनीचे विद्युत पुरवठयाचे २ मीटर सह पुर्ण जागा तुम्हास विक्री केलेली आहे.

सदर जागेची चतु:सिमा - पुर्वेस - सिटी सर्व्हे नंबर ४४४६ - पश्चिमेस - सदर सिटी सर्व्हे नंबर ४४४७ पैकी माधव गोविंदराव कुलकर्णी यांची जागा - दक्षिणेस - डी. पी. रस्ता - व उत्तरेस - सिटी सर्व्हे नंबर ४४४८.

याप्रमाणे वर वर्णन केलेली चतु:सिमेच्या आतील घर जागा संपुर्ण मी तुम्हास एकुण रक्कम मजकुर मध्ये आजरोजी या दस्त आधारे निव्वळ कायम खुष खरेदी दिली आहे. सदर जागेचा ताबा तुम्हास आजरोजी दगड माती तदंगभुत वस्तुसह व यातील बांधकामासह दिलेला आहे.

उमब

Scanned with OKEN Scanner

तरी तुम्ही या दस्ताधारे संपुर्ण मालक या नात्याने वंशपरंपरा वहिवाट किंवा विल्हेवाट करावी. माझी अगर माझे वारसांची तक्रार चालणार नाही. सदर जागेसंबंधी तुमच्या मालकी वहिवाटीस कोणी हरकत अथवा हस्तक्षेप केल्यास किंवा या जागेवर काही कर्जबोजा निघाल्यास त्याचे सर्व सारले मी स्वत: करीन. तुम्हास त्याची तोषिस अथवा खर्च लागु देणार नाही. सदर जागेवर यापुढे माझा अथवा माझे इतर वारसांचा काही दावा मालकी हक्क किंवा संबंध बाकी राहिलेला नाही.

सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात वाद प्रलंबित नाही. माझे माहितीप्रमाणे सदर दस्त नोंदणी करीता कोणत्याही कायद्याचे बंधन नाही. सदर दस्त नोंदणी केल्यामुळे काही कायदेशिर बाब उद्‌भवल्यास त्यास सर्वस्वी मी जवाबदार आहे. सदर दस्तासोबत जोडलेली कागदपत्रे संबंधित कार्यालयातुन घेतलेली असुन यात काही फेरबदल नाही. तथापि १९०८ चे कलम ८२ नुसार सदरील दस्तास जोडलेली कागदपत्रे खोटी निघाल्यास यास आम्ही जबाबदार आहोत.

याप्रमाणे हे खरेदीखत मी राजीखुषीने व कोणाच्याही दबावाखाली न येता लिहून दिले ते खरे. दिनांक ०७/११/२०१४ दस्तुर पी.ना. कुलकर्णी

लिहुन देणार :-




अकबरखान गुलाबखान पठाण

लिहुन घेणार :-




Mujjami

१) मुजमील अब्दुलकरीम खान




Mudassar

२) मुदस्सर अब्दुलकरीम खान

उमब

**साक्षीदार**

१) Pathan

इम्रानखाँ अमीरखाँ पठाण
वय २८ व्यापार रा. खडकपुरा
उस्मानाबाद

२) जावेद

जावेद मेहमुद शेख
वय ५५ व्यापार रा.
ख्वाजा नगर उस्मानाबाद

दुय्यम निबंधक उस्मानाबाद
उमब
४८८ / ८ /२२
२०२४

Scanned with OKEN Scanner